# गौरव - अभिनंदन



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे अग्निशमन विभागात वाहन अग्नियंत्रचालक (D.C.F.E.O.) या पदावर कार्यरत असलेले श्री. दिपक जगन्नाथ जुन्नरे यांची नाशिक जिल्ह्याकरिता महाराष्ट्र शासनाकडून विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**कार्यकारी अभियंता श्री. दिगंबर मोरे श्रमभूषण पुरस्काराने सन्मानित**



महाराष्ट्र राज्य औष्णिक वीज केंद्र, एकलहरे येथे कार्यरत असलेले श्री. दिगंबर जगन्नाथ मोरे - कार्यकारी अभियंता म्हणून वीज केंद्रात काम करत असून ते योगाशिक्षक व निसर्गोपचार तज्ञ (एन.डी.) ही परीक्षा पास झाले असून त्यांनी आजपर्यंत महाराष्ट्रात विविध ठिकाणी योगवर्गाचे आयोजन केले आहे. त्यांना खेळातही विविध सन्मान प्राप्त आहेत. झिम्बाम्ब्वे या ठिकाणी भारत सरकारतर्फे प्रशिक्षण देण्यासाठी पाठविले होते.

ऊर्जाबचत, विस्तार अतिरिक्त संचालक केंद्रिय ऊर्जा संशोधन संस्था, दिल्ली यांच्यातर्फे उत्कृष्ट अभियंता व त्यांच्या कामाची योग्य ती दखल घेऊन सन्मानपत्राने गौरविण्यात आले. हा सन्मान २००९ मध्ये मिळविणारे राज्यातील पहिले अधिकारी आहेत.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे रसायनतज्ञ म्हणून कार्यरत असणाऱ्या सौ. कल्पना बावा यांनी दि. ३ व ४ डिसेंबर २००९ रोजी पुणे येथे इंडो इटालियन कॉन्फरन्स "इमरजिंग ट्रेन्डस् इन वेस्ट मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी २००९" मध्ये "क्वॉलिटी ॲसेसमेंट ऑफ इन्टेक वॉटर अँड इटस् इफेक्ट ऑन नाशिक थर्मल पॉवर स्टेशन" या विषयावर प्रेझेन्टेशन केले.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. बजरंग परदेशी यांचे चिरंजीव कुमार सिध्दार्थ बजरंग परदेशी याने कलकत्ता येथे झालेल्या ५५व्या नॅशनल स्कूल गेम्स २००९ मध्ये १४ वर्षाखालील गटात भाग घेऊन स्विमींगमध्ये दुसरा क्रमांक मिळविला.



नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे येथे अग्निशमन विभागात वाहन अग्नियंत्र चालक पदावर कार्यरत असलेले श्री. दिपक जगन्नाथ जुन्नरे यांची मुलगी कुमारी. शिवानी हिला मेन्सा इंडियातर्फे आयोजित राज्य पातळीवरील बुध्दिमत्ता चाचणीत ९९ गुण मिळाले. तसेच तिला मेन्सा इंडियाचे सभासदत्वसुध्दा देण्यात आले.



कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात कार्यरत असलेले श्री. रमेश गणोरकर, कारागीर-अ यांची महाराष्ट्र शासनाने नुकतीच विशेष कार्यकारी अधिकारी या पदी नियुक्ती केली आहे. यापूर्वी श्री. रमेश गणोरकर यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त झाला आहे.

त्यांना सामाजिक कार्याची आवड असून कामगार चळवळीत त्यांचे सक्रीय योगदान आहे. श्री. रमेश गणोरकर यांच्या नियुक्तीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



**First Model Case of Employees's Pension Scheme 1995 while in Service**

Shri. A.T. Zod, Peon at the O/o. G.M. (TIC), Nagpur recently completed 58 years of service. Being a Class IV employee, the retirement age is 60 years and entitled for pension under Employee's Pension Scheme 1995, after completion of 58 years. The pension order, First Model Case of Employee's Pension Scheme 1995 while in service of Shri. A.T. Zod, was issued by Shri. Manish Agnihotri, Regional P F Commissioner, Nagpur at Conference Hall, Vidyut Bhavan, Nagpur on dtd. 15/09/2009. On this occasion, Shri. Ramesh Bodade, Chief Engineer - In Charge, Shri. Kishore Pawar - CIRO, Shri. Shyam Deshmukh - Trustee, Regional PF and Employees were present.

***शंकर शंखपाळे दादा कोंडके पुरस्काराने सन्मानित***



कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत असलेले श्री. शंकर शंखपाळे यांना मराठी नाट्यक्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल नुकताच पुणे येथे दादा कोंडके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्वर्गीय दादा कोंडके यांचे भाचे श्री. पद्माकर मोरे यांचे हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यापूर्वी श्री. शंखपाळे यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या आठ आणि महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व राज्य नाट्य स्पर्धेतील १० नाटकांमध्ये पारितोषिके मिळाली आहेत. त्यांनी २५ पेक्षा जास्त नाटकांमध्ये भूमिका केल्या असून १६ पेक्षा जास्त नाटके दिग्दर्शित केली आहेत. यासोबतच "वैष्णव" या हिंदी धारावाहिकेमध्ये त्यांनी डॉ. श्रीराम लागू आणि निळू फुले यांचे सोबत भूमिका साकारली आहे. तर जब्बार पटेल दिग्दर्शित "डॉ. आंबेडकर" या चित्रपटात त्यांनी आपल्या अभिनयाचे कसब रसिक श्रोत्यांना दाखवून दिले आहे.

***प्रतिक्रिया***

आपण आपल्या महानिर्मिती कंपनीच्या सृजन अंकामध्ये सर्व प्रकारच्या बातम्या व समाचार व्यवस्थित व फोटोसह छापता, त्यामुळे सर्व कर्मचारी, अभियंता व अधिकारी फार समाधानी आहेत. नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!!!

| | |
|---|---|
| **श्री. विनायक क्षीरसागर** | **श्री. आसाराम शिंदे** |
| कारागीर - क | कारागीर - अ |
| नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे | नाशिक औ.वि. केंद्र, एकलहरे |